# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## कोलकात्यात बांधकामाधीन गोदाम कोसळून ३ ठार

कोलकाता दि.२४ (वृत्तसंस्था)- दक्षिण कोलकातामधील ताराताला ट्रान्सपोर्ट डेपोजवळ बुधवारी दुपारी १.३० वाजता बांधकाम सुरू असलेल्या गोदामाचे शेड अचानक कोसळले. या घटनेत आतापर्यंत ३ लोकांचा मृत्यू झाला आहे. ४० हून अधिक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत १४ लोकांना वाचवण्यात आले आहे.

स्थानिक लोकांच्या मते, अपघाताच्या वेळी गोदामात कॉंक्रीट टाकण्याचे काम सुरू होते. पोलिसांच्या माहितीनुसार, बचावकार्यात कोलकाता पोलीस, आपत्कालीन व्यवस्थापन गट, नागरी संरक्षण, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा तसेच लष्करही सहभागी झाले आहे.

ढिगारा आणि लोखंडी सळ्या हटवण्यासाठी क्रेन मागवण्यात आली आहे. गॅस कटरने लोखंडी सळ्या कापल्या जात आहेत. ढिगाऱ्याखाली दबलेल्या मजूर-कर्मचाऱ्यांच्या किंकाळ्याही ऐकू येत आहेत, त्यांना लवकरात लवकर वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.


(वर्ष ६५ वे अंक १६३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२५ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## नसरापूर अत्याचार खटल्याचा आज अंतिम निकाल

### १५ दिवसांत आरोपपत्र, ५५ साक्षीदार अन् 'इन कॅमेरा' सुनावणी

पुणे दि.२४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करुन खून करण्यात आल्यानंतर राज्यभरात संतप्त पडसाद उमटले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या पावणेदोन महिन्यात या खटल्याचा निकाल गुरुवारी (२५ जून) लागणार आहे. राज्यातील न्यायालयीन इतिहासात जलदगतीने सुनावणी झालेला नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिलाखटला ठरणार आहे.

महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करुन खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांच्या राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेनंतर पुणे शहर, जिल्ह्यासह राज्यात संतप्त पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांनी केली होती. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक करण्यात आले. या पथकात सहा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. तपास अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी या प्रकरणाचा तपास केला. या प्रकरणात भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला अटक करण्यात आली.

या खटल्यात सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, प्रत्यक्षदर्शींची साक्ष अशा विविध बाजूने तपास करुन पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर १५ दिवसात १२०० पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपपत्रासोबत ५५ पेक्षा जास्त साक्षीदारांचे जबाब, परिस्थितीजन्य पुरावे, तसेच तांत्रिक पुरावे जोडण्यात आले होते. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयात २१ मेपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी सुरू झाली.

नसरापूर अत्याचार प्रकरण संवेदनशील असल्याने या प्रकरणाची सुनावणी बंद दाराआड (इन कॅमेरा) झाली. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी पीडित बालिकेचे आई-वडील, आजी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच, तपास अधिकारी, न्यायवैद्यकीय तज्ज्ञ, डीएनए विश्लेषक यांच्यासह ५५ जणांची साक्ष नोंदविली. ॲड. मिसर यांना ॲड. प्रथमेश शिंगणे यांनी सहायक केले. बचाव पक्षाकडून ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी बाजू मांडली, पीडित बालिकेच्या कुटुंबीयांकडून ॲड. राधिका नावंदर-जोशी, ॲड. मनीष पाडेकर यांनी काम पाहिले. या खटल्यात सरकार पक्ष आणि बचाव पक्षाने अंतिम युक्तिवाद पूर्ण केला आहे. न्यायालयने या खटल्याचा निकाल राखून ठेवला आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके हे गुरुवारी (२५ जून ) या खटल्याचा निकाल देणार आहे.

## राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली असून उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांनाही यावर्षाअखेरीस दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य सदाभाऊ खोत यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य बच्चू कडू, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मे महिन्यात काही वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये एकाच वेळी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अल्पकाळासाठी भारनियमन करावे लागले होते. मात्र सध्या राज्यात कोणतेही भारनियमन करण्यात येत नाही. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत विविध भौगोलिक परिस्थितींना अनुरूप मॉडेल विकसित करण्यात आली आहेत. नदीकाठ, पूररेषा, कालवे तसेच खोल जल स्त्रोतांमधून पाणी उपसा करण्यासाठी मोनोपोल, बूस्टर पंप आणि तरंगत्या सौर पंपांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात १० लाखांहून अधिक सौर पंप बसविण्यात आले असून शेतकऱ्यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत राज्यात सुमारे २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये फीडर विभक्तीकरण, नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे (डीपी) आणि वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुढील तीन वर्षांत या कामांमुळे डीपी निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डार्क झोन भागातील शेतकऱ्यांनाही दिलासा देण्यासाठी खोल जलस्तर असलेल्या भागांमध्ये अधिक क्षमतेचे पंप, बूस्टर पंप आणि त्यावर अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच सौर पंपधारकांना वीजबिलाचा कोणताही प्रश्न राहत नसल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर २०३१-३२ पर्यंत ७८ हजार मेगावॅट वीज क्षमता उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षमतेचे प्रभावी वहन सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्समिशन कॉरिडॉर उभारणीवर विशेष भर देण्यात येत असून टीबीसीबी पद्धतीद्वारे १६ हजार कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. पुढील तीन वर्षांत ट्रान्समिशन क्षेत्रात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मुंबईच्या वीज सुरक्षेसाठी 'मुंबई आयलँडिंग' संकल्पनेअंतर्गत महत्त्वाचे ट्रान्समिशन कॉरिडॉर पूर्ण करण्यात आले असून आता मुंबईत अतिरिक्त ३ हजार मेगावॅट वीज आणण्याची क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मुंबईचा वीजपुरवठा अबाधित ठेवणे शक्य होणार आहे.

### महिला सुरक्षेसाठी समिती स्थापन करणार

काही कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये महिलांवरील छळाच्या घटनांबाबत विशिष्ट कार्यपद्धती दिसून येत आहे. त्यामुळे विद्यमान कायदे व नियमांचे पुनरावलोकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी विधानसभा व विधानपरिषदेतील महिला सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ती महिला सुरक्षेसंदर्भातील कायदे, नियम आणि घडलेल्या घटनांचा अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचवेल. राज्य शासन त्या शिफारशींची अंमलबजावणी करेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

नाशिक येथील टीसीएस कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक व मानसिक शोषण केल्याबाबत विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत डॉ. नीलम गोऱ्हे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिक येथील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या कथित लैंगिक व मानसिक शोषणाच्या प्रकरणाची चौकशी सुरू असून या प्रकरणात आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित महिलेच्या तक्रारीवर तत्काळ कारवाई न करणाऱ्या व्यवस्थापकाचाही आरोपी म्हणून समावेश करण्यात आला आहे.

## लग्नपत्रिकेवर वर-वधूच्या नावापुढे जन्मतारीख लिहावी लागणार

### राज्य सरकार लवकरच नियम लागू करणार

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यात लग्नपत्रिकेवरती आता नवरा नवरीच्या नावापुढे ही जन्मतारीख लिहावी लागणार आहे. राज्य सरकार लवकरच या संदर्भात निर्णय घेण्याच्या तयारीत असून हा नियम लागू केला जाणार आहे. राजस्थान सरकारच्या निर्णयानंतर आता महाराष्ट्र सरकार देखील या निर्णय घेणार असल्याची माहिती आहे. बालविवाहाबाबत धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर सरकार खडबडून जागं झालं आहे. परिणामी या निर्णयामुळे वर वधूचे वय कळू शकणार आहे. त्यामुळे बालविवाहाला आळा बसणार असा दावा केला जात आहे.

दुसरीकडे, राज्यात बालविवाहाबाबत धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. परभणी जिल्हात ४८% मुलींचे अल्पवयात लग्न झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यांत बालविवाहाचे प्रमाण चिंताजनक असल्याची माहिती विधानसभेत सरकारकडून सादर केलीय. बालविवाह कायद्याने गुन्हा असून देखील समोर आलेली आकडेवारी धक्कादायक आहे. परिणामी कायद्याची अंमलबजावणी काटेकरपणे व्हावी या अनुषंगाने या नव्या निर्णायाची तयारी राज्य सरकारने केली आहे.

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकार व्यापक उपाययोजना करणार-कृषिमंत्री भरणे

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- शेतकरी सक्षमीकरण, कर्जमुक्ती, हवामान बदलाशी सामना, कृषी पायाभूत सुविधा, पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसह विविध विषयांवर शासन व्यापक उपाययोजना राबवत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितले. राज्य शासनाने अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा लाभ ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होणार असून लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना दिलासा देत शेतकऱ्याचे हित साधणारे हे सरकार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्य शासन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर करण्यात आली आहे. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वांत मोठी कर्जमाफी योजना ठरणार आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत कर्जाची कर्जमुक्ती, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तसेच महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थ्यांसाठीही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या योजनेचा लाभ सुमारे ५६.२४ लाख शेतकऱ्यांना होणार असून ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे.

खरीप २०२६ हंगामात एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शासनाने व्यापक पूर्वतयारी केली आहे. कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचे बियाणे उपलब्ध करून देणे, बीबीएफ तंत्रज्ञानाद्वारे पेरणीस प्रोत्साहन, शेततळी, सूक्ष्म सिंचन, मल्चिंग यांसारख्या उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी सन २०२६-२७ मध्ये दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आहे. ड्रोन, शेतकरी सुविधा केंद्रे, जैविक शेती आणि कृषी पायाभूत सुविधा उभारणीस प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेती व्यवसाय करताना मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास दिल्या जाणाऱ्या सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आहे. महाडीबीटी पोर्टलमार्फत ही योजना ऑनलाइन राबविण्यात येणार असून शेतकऱ्यांना कार्यालयीन प्रक्रियेचा त्रास होणार नाही, पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत राज्यातील १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत ४२ हजार ९०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून १४ हजार ८१६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## कर्जमुक्ती योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकऱ्यांना होणार-सहकारमंत्री

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभ देऊन न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पूर्वीच्या कर्जमाफी योजनेत लाभ मिळालेल्या १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांनाही यंदाच्या योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासन सकारात्मक असून, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत लवकरच निर्णय घेतला जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत नियम २९३ प्रस्तावा अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. मंत्री पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शेती, सिंचन आणि जल संधारण क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या स्मरणार्थ या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. शेतकरी हिताचे निर्णय घेणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

शेतकऱ्यांना वारंवार कर्जबाजारी व्हावे लागू नये आणि ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत यासाठी माजी मुख्य सचिव प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. अल्पमुदत, दीर्घमुदत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांच्या संदर्भात समितीने विविध उपाययोजनांच्या शिफारशी केल्या आहेत असे त्यांनी म्हटले आहे.

## तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा केलेत

### जितेंद्र आव्हाडांच्या विधानसभेतील दाव्याने खळबळ

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- तुकाराम मुंढे हे अन्न व औषध प्रशासन विभागाचे (एफडीए) आयुक्त झाल्यापासून हे खाते देशभरात चर्चेत आले आहे. सरकारनं या विभागाला गांभीर्याने घेतलेच नसल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. भेसळीने कॅन्सरच्या आजारात वाढ झाली आहे. माल तपासणीसाठी पाठवला जातो तो अद्यावत नाही असे आव्हाड म्हणाले. तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा केल्याची धक्कादायक माहिती जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत दिली.

तुकाराम मुंढे यांची मोठी सुपारी घेण्यात आली आहे. २५० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. ड्रग्ज लॉबी, मेडिकल कंपन्या अशा अनेक एकत्र येऊन तुकाराम मुंढे यांच्या पाठीमागे लागलेले आहेत. पुढच्या आठवड्यात मी नावानिशी सगळं समोर आणणार असल्याचे आव्हाड म्हणाले. अन्न व प्रशासन विभाग झिरवळ चालवत नसून ते आणखी कोणीतरी चालवत आहेत असा आरोप देखील आव्हाडांनी केला.

तुकाराम मुंढे यांची विकेट काढायला २५० कोटी रुपये जमा केले जात असल्याचं वक्तव्य जितेंद्र आव्हाड यांनी केलं आहे. अधिकारी त्याच त्या (पान ४ वर)

## हॉटेलमध्ये पिण्यायोग्य पाणी मोफत द्या, समोर लगेच पाण्याच्या बाटल्या ठेवू नका; तुकाराम मुंढेंचा आदेश

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट, धाबे, इटरीज आणि ज्या ठिकाणी अन्न प्रक्रिया केली जाते त्यांनी नियमांचे पालन करणं बंधनकारक आहे. त्याचं जर उल्लंघन केलं तर त्यांना कुणीही वाचवू शकणार नाही असा इशारा राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. तसेच हॉटेल्सनी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत देणं गरजेचं आहे, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा, अन्यथा कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावं यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम राबवली जात आहे. त्यासाठी सर्वांनीच नियमांची अंमलबजावणी करावी, अन्यथा कारवाई करण्यात येईल असं तुकाराम मुंढे म्हणाले.

राज्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर सर्व ठिकाणी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत उपलब्ध करण्यात यावं, बाटलीबंद (पान ४ वर)

## महामार्गांसाठी लाखो कोटी, पण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पैसा नाही?

### जयंत पाटलांचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकरी, वाढती महागाई, इंधन दरवाढ, कृषी उत्पादन खर्च आणि कर्जमाफीच्या प्रश्नांवरून राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)चे नेते जयंत पाटील यांनी विधानसभेत सरकारवर जोरदार टीका केली. पावसाळी अधिवेशनात नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होताना त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. जयंत पाटील म्हणाले की, सरकार मोठमोठे महामार्ग, पायाभूत सुविधा आणि विविध विकासकामांसाठी लाखो कोटी रुपयांचा निधी खर्च करत आहे. मात्र, राज्यातील अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची इच्छाशक्ती सरकारमध्ये दिसत नाही. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देणारे निर्णय घेण्याची गरज आहे.

चर्चेदरम्यान जयंत पाटील यांनी २००८ मध्ये केंद्र सरकारने केलेल्या ऐतिहासिक कर्जमाफीचा उल्लेख केला. तसेच राज्यातील विविध सरकारांनी वेळोवेळी शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या योजनांची आठवण करून दिली. कर्जमाफीचे राजकीय श्रेय घेण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना प्रत्यक्ष मदत करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, आजही अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला योग्य दर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट होत आहे.

(पान ४ वर)

## भाषणात झालेल्या चुकांवरुन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी व्यक्त केली दिलगिरी

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- त्या दिवशी १२ शोक प्रस्ताव होते आणि त्याचे वाचन मी सभागृहात केले. ते प्रिंट जी माझ्या हातात आलेली ती प्रिंट अत्यंत बारीक फॉन्टमध्ये होती आणि थोडी अस्पष्ट होती. त्याप्रमाणे त्याच्यात काही तांत्रिक चुका होत्या ज्या सुरुवातीला नोट करण्यात आल्या नव्हत्या. वाचन करत असताना तसंच्या तसं ते वाचन झालं, ही एक चूक त्या दिवशी वाचन करत असताना माझ्याकडनं घडली, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. शोक प्रस्तावात मराठी वाचनाच्या २६ हून अधिक चुका करणाऱ्या राहुल नार्वेकरांवर सडकून टीका होत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुद्धा नार्वेकरांच्या मराठीवर फटकारले होते. सोशल मीडियातही प्रहार सुरु होताच राहुल नार्वेकर यांनी दिलगिरीनामा विधानसभेत सादर केला.

नार्वेकर यांनी सांगितले की, स्वर्गीय आशाताई भोसले यांच्याबद्दल अवमानास्पद बोलण्याचा विचारही या राज्यातली कोणतीही व्यक्ती करू शकत नाही आणि निश्चितपणे विधानसभेचे अध्यक्ष तर मुळीच असं वक्तव्य करू शकत नाहीत. जे घडलं ते एका चुकीमुळे घडलेलं आहे, त्याचा कोणी वेगळा अर्थ काढू नये अशी मी विनंती करतो आणि तरीही त्या भाषणाच्या वाचनाच्या वेळेला जर का राज्यातील किंवा सभागृहातील कुठच्याही व्यक्तीचे, सदस्याचे इकडे मन दुखलं असेल तर मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतोय, असे नार्वेकर म्हणाले.

## अरविंद सावंत आणि अनिल देसाईंनी घेतली लोकसभा अध्यक्षांची भेट

### शिवसेना ठाकरे गटाच्या फुटलेल्या ६ खासदारांवर योग्य कारवाई करण्याची मागणी

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटातील ६ खासदार फुटले असून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला आहे. या ६ खासदारांनी जेव्हा बंड पुकारले होते तेव्हा शिवसेना ठाकरे गटाने महत्त्वाची बैठक बोलावली होती.

मात्र या बैठकीला ६ खासदार गैरहजर होते. त्यानंतर आता खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. या बैठकीनंतर सावंत आणि देसाई यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

अरविंद सावंत म्हणाले, आम्ही माननीय बिर्ला साहेबांना एक पत्र दिले होते. त्या पत्रात आम्ही अशी विचारणा केली होती की आमच्याकडून जे ६ गैरहजर राहिलेले खासदार आहेत, त्यांनी कोणाला व्यक्तिगत पत्र दिले असेल किंवा काही प्रस्ताव दिला असेल तर आपण तो त्याची दखल घेऊ नये. कारण ते आमच्या पक्षातील माणसं आहेत. ते आमच्यासोबत आहेत. त्यांनी पक्ष सोडल्याचा काही दावा केला असेल तर ते आम्हाला कळवावे. तसेच चुकून असा काही प्रस्ताव आला किंवा माहिती आली तर आमच्या सोबत आपण बोलले पाहिजे आणि चर्चा केली पाहिजे, अशी विनंती केली होती. त्यांनंतर त्यांनी बैठकीसाठी बोलावले होते.

पुढे बोलताना अरविंद सावंत म्हणाले, बैठकीत आम्ही त्यांना सांगितले की दरम्यानच्या काळात असे दिसून आले होते की ६ लोक आले नव्हते आणि असे करत ही मंडळी दुसऱ्या पक्षात गेली. म्हणून आज आम्ही असे निवेदन दिले की दोन तृतीयांशच्या संदर्भात काही आले असेल तर त्या बाबतीत देखील आमचे काही म्हणणे आहे आणि ते कायदेशीर आणि संविधानात्मक आहे.

अनिल देसाई यांनी माहिती देताना सांगितले की, आम्ही लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. आमचे जे लोकसभेचे खासदार आहेत, त्यातील काही लोकांनी गट केला असेल आणि आपल्याजवळ आले आणि त्यांनी काही व्यवस्था करण्याची मागणी केली असेल तर त्या प्रकाराला कुठलाही थारा न देता आमचे म्हणणे ऐकावे. संविधानात ज्या तरतुदी आहेत त्या पाळल्या जाव्यात.

## खर्गे पिता-पुत्रावर भाजपचा १०० कोटींच्या जमीन घोटाळ्याचा गंभीर आरोप

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- भाजपाने कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि त्यांचे पुत्र प्रियांक खर्गे यांच्यावर कर्नाटकमध्ये जमीन घोटाळ्याचा आरोप केला आहे. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी खर्गे पिता-पुत्रांनी कर्नाटकमध्ये जमीन हडपल्याचा आरोप बुधवारी केला. सिद्धार्थ विहार ट्रस्टच्या माध्यमातून हा घोटाळा केल्याचा आरोप भंडारी यांनी केला. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यावर जमीन घोटाळ्याचे आरोप झाल्यानंतर आता भाजपाने खर्गे यांच्यावर आरोप केले आहेत.

प्रदीप भंडारी यांनी बुधवारी दिल्लीत एक पत्रकार परिषद घेऊन खर्गे यांच्यावर आरोप केले. सिद्धार्थ विहार ट्रस्टवर खर्गे कुटुंबाचे नियंत्रण असल्याचा दावा करत राजकीय दबावाच्या माध्यमातून खर्गेंनी जमीन हडपल्याचा आरोप भंडारी यांनी केला. "ट्रस्टच्या माध्यमातून खर्गे पिता-पुत्र जमीन हडपत असून, कर्नाटकमध्ये भ्रष्टाचार करत आहेत. सिद्धार्थ विहार ट्रस्ट असे या ट्रस्टचे नाव असून, मल्लिकार्जुन खर्गे, प्रियांक खर्गे यांच्यासह त्यांचे कुटुंबीय या ट्रस्टचे (पान ४ वर)

# अस्थिरतेचे नवे आव्हान

मध्यपूर्वेतील इतिहासाने वारंवार दाखवून दिले आहे, की हिंसेतून टिकाऊ समाधान मिळत नाही. शस्त्रांपेक्षा संवाद, समन्वय आणि परस्पर आदर हाच शांततेचा मार्ग आहे. त्यासाठी प्रयत्न करणे ही आजची गरज आहे.

भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला लेबनॉन हा देश आकाराने लहान असला, तरी मध्यपूर्वेच्या राजकारणात त्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या काही दशकांपासून हा देश प्रादेशिक शक्तीसंघर्ष, धार्मिक ध्रुवीकरण, बाह्य हस्तक्षेप आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता यांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अशा परिस्थितीत लेबनॉनमध्ये पुन्हा वाढत असलेला तणाव आणि युद्धविरामाच्या प्रयत्नांबाबत निर्माण झालेली अनिश्चितता ही केवळ एका देशाची समस्या नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या भवितव्याशी संबंधित बाब आहे. हिज्बुल्लाहची भूमिका, इस्रायलची सुरक्षा धोरणे, इराणचा प्रभाव आणि अमेरिकेची मध्यस्थी यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. आज जग एका अशा टप्प्यावर उभे आहे, जिथे युद्धे केवळ रणांगणावर लढली जात नाहीत, तर राजनैतिक मंचांवर, आर्थिक धोरणांमध्ये आणि जनमताच्या पातळीवरही लढली जातात.

लेबनॉनमधील परिस्थिती हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. संघर्षातील प्रत्येक पक्ष आपली भूमिका योग्य असल्याचा दावा करतो; परंतु या सर्व दाव्यांच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे या संघर्षाचा शेवट नेमका कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या मार्गाने होणार आहे? मध्यपूर्वेतील राजकारण समजून घेताना हिज्बुल्लाहकडे केवळ एका सशस्त्र संघटनेच्या रूपात पाहणे अपुरे ठरते. लेबनॉनच्या सामाजिक आणि राजकीय संरचनेत या संघटनेचे खोलवर अस्तित्व आहे. देशातील अनेक भागांमध्ये तिचा प्रभाव केवळ सुरक्षा विषयांपुरता मर्यादित नसून सामाजिक सेवा, राजकीय प्रतिनिधित्व आणि स्थानिक नेतृत्वाशीही जोडलेला आहे. त्यामुळे लेबनानमधील कोणतीही शांतता प्रक्रिया हिज्बुल्लाहला पूर्णपणे बाजूला ठेवून यशस्वी होईल, अशी अपेक्षा वास्तववादी वाटत नाही.

शांततेसाठी नेहमीच संवाद आवश्यक असतो आणि संवादासाठी सर्व प्रभावी घटकांचा सहभाग आवश्यक असतो. दुसरीकडे, इस्रायलची भूमिकादेखील समजून घेणे आवश्यक आहे. इस्रायलने आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सीमावर्ती भागांमधून होणारे हल्ले, क्षेपणास्त्रांचा धोका आणि शत्रुत्वाची भावना यामुळे इस्रायल अनेकदा कठोर लष्करी कारवाया करतो. त्याच्या दृष्टीने या कारवाया राष्ट्रीय सुरक्षेचा भाग असतात; परंतु प्रत्येक लष्करी कारवाईचे परिणाम केवळ लक्ष्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर, पायाभूत सुविधांवर आणि समाजाच्या मानसिकतेवरही होतो. युद्ध जितके लांबते, तितकी द्वेषाची दरी खोल होत जाते. या संपूर्ण समीकरणात इराणची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव हा आजच्या मध्यपूर्वेतील सर्वात गंभीर भू-राजकीय प्रश्नांपैकी एक मानला जातो. लेबनॉनमधील संघर्षाला व्यापक प्रादेशिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले, तर त्याचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. अशा परिस्थितीत केवळ लेबनॉन किंवा इस्रायल नव्हे, तर संपूर्ण प्रदेश अस्थिरतेच्या गर्तेत जाऊ शकतो. यामुळे ऊर्जा बाजारपेठा, जागतिक व्यापार आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. अमेरिकेने अनेक दशकांपासून मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत.

काही प्रयत्न यशस्वी ठरले, तर काही अपयशी; मात्र इतिहास सांगतो, की स्थानिक घटक तयार असतात, तेव्हाच बाह्य शक्तींची मध्यस्थी प्रभावी ठरते. कोणत्याही संघर्षाचा तोडगा बाहेरून लादता येत नाही. तो संबंधित समाजांनी आणि नेतृत्वाने स्वीकारला पाहिजे. अन्यथा करार कागदावर राहतात आणि वास्तवात संघर्ष कायम राहतो. लेबनॉनची अंतर्गत परिस्थितीही हे संकट अधिक गंभीर बनवते. गेल्या काही वर्षांमध्ये देशाने आर्थिक दिवाळखोरी, चलनवाढ, बेरोजगारी आणि राजकीय अनिश्चिततेचा सामना केला आहे. अनेक कुटुंबांचे जीवन आधीच संकटात सापडले आहे. अशा वेळी संघर्ष तीव्र झाल्यास सामान्य नागरिकांची परिस्थिती बिकट होऊ शकते. युद्धाचा सर्वात मोठा फटका युद्धाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्यांना बसतो. त्यांच्या घरांचे, रोजगाराचे, शिक्षणाचे आणि भविष्याचे नुकसान होते. युद्धाच्या बातम्यांमध्ये अनेकदा शस्त्रास्त्रे, रणनीती आणि राजकीय घोषणा यांवर भर दिला जातो; परंतु प्रत्येक संघर्षामागे मानवी वेदनांची एक मोठी कहाणी दडलेली असते. हजारो कुटुंबे विस्थापित होतात. मुलांचे शिक्षण खंडित होते. रुग्णालयांवर ताण वाढतो आणि संपूर्ण पिढी असुरक्षिततेच्या वातावरणात वाढते. त्यामुळे कोणत्याही संघर्षाचे मूल्यांकन करताना मानवी हक्क आणि मानवी जीवन केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. आजची सर्वात मोठी गरज म्हणजे संयम आणि संवाद. संघर्षातील कोणताही पक्ष स्वतःला पूर्णपणे विजयी समजू शकत नाही. आधुनिक युद्धांमध्ये स्पष्ट विजयापेक्षा दीर्घकालीन नुकसान अधिक दिसून येते. आर्थिक संसाधने खर्ची पडतात, सामाजिक एकात्मता कमकुवत होते आणि भविष्यातील विकासाला मोठा धक्का बसतो. त्यामुळे युद्ध सुरू ठेवण्यापेक्षा संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरते.

मध्यपूर्वेच्या इतिहासात अनेकदा तणाव नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली असली, तरी संवाद आणि राजनैतिक प्रयत्नांमुळे संघर्ष कमी झाल्याची उदाहरणेही आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.त्यामुळे लेबनॉनमधील सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीने पाहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय, प्रादेशिक शक्ती आणि स्थानिक नेतृत्व यांनी शांततेसाठी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजचा संघर्ष केवळ सीमावाद किंवा लष्करी कारवायांपुरता मर्यादित राहिलेला नाही; मध्यपूर्व हा प्रदेश गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष, राजकीय स्पर्धा, धार्मिक ध्रुवीकरण आणि जागतिक महासत्तांच्या हस्तक्षेपामुळे सतत अस्थिर राहिला आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, सीरिया युद्ध, इराण-सौदी अरेबिया स्पर्धा आणि विविध सशस्त्र संघटनांची उपस्थिती यामुळे या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न वारंवार अपुरे ठरले आहेत. अशा परिस्थितीत लेबनॉनमधील तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे.

हिज्बुल्लाहने युद्धविरामाच्या प्रस्तावाला विरोध दर्शवल्याची माहिती समोर येत असताना आणि इस्रायलने लष्करी कारवाया सुरू ठेवण्याची भूमिका घेतल्याने संपूर्ण प्रदेशातील स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धविराम हा संघर्षाचा अंतिम तोडगा नसला तरी शांततेकडे जाणारा पहिला महत्त्वाचा टप्पा असतो. तो नागरिकांना दिलासा देतो, मानवी मदत पोहोचवतो आणि चर्चेसाठी वातावरण तयार करतो. मात्र सर्व पक्ष सहभागी नसतील तर त्याचे यश अनिश्चित राहते. लेबनॉनमधील घडामोडी याचीच आठवण करून देतात.

# उश:काल होता होता काळरात्र झाली

**भारताला** स्वातंत्र्य मिळतानाच भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी स्वतंत्र घटना समितीची स्थापना करण्यात आली होती. अनेक दिग्गज नेते या समितीचे सदस्य होते. या विचारमंथनात आणीबाणीचे कलम घटनेत असावे की नसावे या विषयी सखोल चर्चा झाली. काही सदस्यांचा या कलमाला प्रखर विरोध होता कारण त्यांना भीती वाटत होती की या कलमाचा भविष्यात दुरुपयोग केला जाईल. पण जवाहरलाल म्हणाले की तुम्हाला असे वाटते का की मी या कलमाचा दुरुपयोग करीन. तेव्हा हरी विष्णू कामत यांनी नेहरूना उत्तर दिले की तुम्ही काही अमरपट्टा घेऊन आला नाहीत.कामथ यांची भीती खरी ठरवली ती नेहरुंच्या कन्येने, इंदिरा गांधी यांनी,बरोबर २५ वर्षांनी.

दिनांक २५ जून १९७५ हा दिवस इतर सर्वसामान्य दिवसाप्रमाणे उगवला पण संपताना मात्र एका असाधारण अवस्थेत संपला. आणि याची जाणीव झाली दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा इंदिरा गांधींनी राष्ट्राला उद्देशून रेडिओवरून भाषण केले आणि देशभरात आणीबाणी लागू केल्याची घोषणा केली. हे भाषण ऐकले आणि सुरेश भटांच्या 'उशः काल होता होता काळरात्र झाली अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली' या काव्यपंक्तीची आठवण झाली. २५ जून २०२६ रोजी या घटनेला ५१ वर्षे होत आहेत.

मराठी माणूस जसा १७६१ ची 'संक्रान्त' २५० वर्षे होऊन गेली तरी विसरू शकत नाही त्याप्रमाणे भारतीय नागरिक २५ जून १९७५ची काळरात्र कधीही विसरणार नाही. १७६१च्या संक्रातीला मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाला,पानिपतच्या पराभवाने,जे गालबोट लागले त्याचा 'सल' अजूनही मराठी मनाला अस्वस्थ करतो., त्याप्रमाणे २५ जून १९७५ या दिवशी भारतीय लोकशाहीचा गळा घोटला गेला त्याच्या दुःखद आठवणी अजूनही काळीज विदीर्ण करतात.

दर वर्षी २५ जूनला या काळ्या पर्वाच्या स्मृती जागवल्या जातातच. त्या दृष्टीने काही जणांना वाटेल की हा शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रकार आहे. ज्यांनी या आणीबाणीचे चटके सहन केले, ज्यांच्या सर्वस्वाची होळी झाली, ज्यांनी आपले आप्तजन गमावले, ज्यांचे संसार धुळीला मिळाले त्या सर्वांच्या त्यागाला नमन करणे आणि त्यांच्या स्मृती चिरंतन ठेवणे हा या आठवणी जागवण्याचा मुख्य हेतू आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे होत आहेत तरी सुद्धा स्वातंत्र्य लढ्याच्या आठवणी अजूनही जागवल्या जातातच ना!!आणीबाणी विरुद्ध जनतेने दिलेला लढा हा दुसरा स्वातंत्र्य लढाच होता असे अनेक 'समाजवादी ' सुद्धा मानतात.

काही कुमार बुद्धीचे सुमार पत्रकार दर वर्षी नेमाने आणीबाणीचे समर्थन करणाऱ्या लेखाचा रतीब घालतात तो आपण त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून चालवून घेतो. मग त्या काळातील अत्याचारांच्या आठवणी दर वर्षी जिवंत केल्या तर काय बिघडले?ज्यांचे जळते त्यांना कळते. त्यांच्या जखमा अजूनही ओल्या आहेत त्यांनाही त्यांचे दुःख इतरांबरोबर 'शेअर करण्याचे स्वातंत्र्य आहेच की!!

मध्यंतरी संघांचे तत्कालीन पदाधिकारी माणिकराव पाटील यांचे 'आणीबाणीतील दुशासन पर्व ' हे पुस्तक वाचनात आले. त्यातील त्यांचे तसेच इतरांचे अनुभव वाचून डोळ्यात पाणी आले. सर्वाना मध्यरात्री कुठल्याही वॉरंटविना पकडून नेण्यात आले. काही वृद्ध स्वयंसेवक धड उभेही राहू शकत नव्हते त्यांनाही अटक करण्यात आली. सर्वांवर, 'मिसा' कायद्याखाली विविध कलमे लावण्यात आली. कैद्याना अटकेविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार नव्हता. भारतीय नागरिकांचे सर्व मूलभूत हक्क हिरावून घेण्यात आले होते. पोलिसाने गोळी घालून हत्या केली तरी त्याच्यावर खटला चालवता येत नव्हता.या सर्व बंदिवनांना 'क' दर्जा दिला होता त्यामुळे गुरांच्या कोंडवाड्यासारखे त्यांना बराकीत इतर कैद्याबरोबर कोंबण्यात आले होते. अन्नाचा दर्जा तर इतका बेकार होता की अनेक राजबंद्यानी अंथरूण धरले होते.

आणीबाणी कशी बिनडोकपणे राबवली गेली त्याचे मासलेवाईक उदाहरण एका त्यावेळी येरवड्यात तुरुंगवास भोगलेल्या राजबंद्याकडून समजले. जेलरच्या परवानगीने संक्रांतीनिमित्त राजबंदीसाठी पुण्यातील संघ परिवाराने ट्रक भरून गुळाच्या पोळ्या पाठवल्या होत्या. त्या पोळ्या ट्रकने आणणाऱ्या ट्रक मालकालाच मिसा खाली अटक करून तुरुंगात डांबण्यात आले.

दुसरा किस्सा तर अजब आहे.जे एन यू मधील विद्यार्थ्यांनी आणीबाणीचा निषेध म्हणून संप पुकारला होता.त्या दिवशी मनेका गांधी, (ज्या त्यावेळी परदेशी भाषा विभागात शिक्षण घेत होत्या ) वर्गात जाण्यासाठी आल्या तर एका विद्यार्थ्याने त्यांना वर्गात न जायची विनंती केली. त्यांना ही विनंती करणारा विद्यार्थी 'मिश्रा 'जे एन यू विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष होता. मनेकाला प्रचंड राग आला आणि तिने संजय गांधींकडे याविषयी तक्रार केली.काही वेळातच, संजय गांधींच्या आदेशानुसार दिल्ली पोलीसचे त्या वेळचे पोलीस प्रमुख भिंदर पोलीस फाट्यासह युनिव्हर्सिटीत घुसले. त्या वेळी विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष तिथे नव्हता. प्रबीर पुरकायस्थ नावाचा विद्यार्थी आपल्या मैत्रिणीची वाट पाहात उभा होता. भिंदरनी या प्रबीरला 'मिश्रा ' समजून पकडले आणि त्यानंतर आणीबाणी उठेपर्यंत प्रबीरला तुरुंगात राहावे लागले.ओळख पटवणे, न्यायालयात उभे करणे वगैरे सर्व सोपस्कार गुंडाळण्यात आले. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला धाकदपटशा दाखवून खोटी कागदपत्रे तयार करून घेतली गेली ती, 'मिश्रा' च्या नावाने. नेमका हा डी. एम. प्रबीरला ओळखत होता पण तो काहीही करू शकला नाही.अशी होती संजय गांधीची दहशत.ज्ञान प्रकाश यांच्या आणीबाणीवरील पुस्तकात हा किस्सा सविस्तर वर्णीला आहे..

आज आपण बघतो खुखार आतंकवाद्याना सुध्दा पत्रकारांना, पोलीस पहाऱ्यात, बाईट्स देण्याची परवानगी आहे. नुकतीच बातमी वाचली की एका यु ए पि ए खाली अटक केलेल्या आरोपीला आईच्या शस्त्रक्रियेच्या वेळी हजर राहण्यासाठी १५ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर झाला आहे.

आजकाल न्यायालये सुध्दा मानवी स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार सर्वोच्च मानून देशद्रोह्यांना जामीन देण्यास आतुर असतात. आणीबाणीत जॉर्ज फर्नांडिस यांना बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. निवडणुकीसाठी त्यांना सोडले नव्हते. त्यांनी तुरुंगातून निवडणूक लढवली व जिंकले.जनता राजवट आल्यावर त्यांची सुटका झाली होती.फर्नांडिस यांना बरोडा डायनामाईट केस मध्ये अटक झाली होती. ते भूमिगत असताना त्यांचा ठावठिकाणा समजावा म्हणून त्यांचे बंधू लॉरेन्स यांना अमानुष मारहाण करण्यात आली होती.

आज जे लेफ्ट लिबरल्स अघोषित आणीबाणी म्हणून गळा काढतात त्यांना काय अधिकार आहे असे म्हणण्याचा!!(यांनीच तर आणीबाणीला पाठिंबा दिला होता.)

दुसरा वर्ग म्हणजे तथाकथित कवी व साहित्यिक, कलावंत यांचा.. सरकारविरुद्ध वाटेल ती टीका करण्याचे स्वातंत्र्य मनसोक्त उपभोगून परत गळचेपी होते म्हणून कांगावा करण्यात हे पुढे असतात. आणीबाणीत चुकून जरी इंदिरा, संजय यांच्याविरुद्ध 'ब' काढला तर थेट तुरुंगात रवानगी होत होती. आज काय स्थिती आहे? मोदींको मारेंगे, मोदींकी चोटी चोटी करेंगे, मोदी 'तेरी कब्र खोदेंगे म्हटले तरी असे बोलणाऱ्याना कायद्याचे संरक्षण मिळते. आज जर खरोखरच 'अघोषित' आणीबाणी असती तर 'सकाळचा भोंगा' आणि त्याला डोक्यावर घेऊन नाचणारे माध्यमकर्मी केव्हाच गजाआड गेले असते. आणीबाणीत, सरकारी अधिकाऱ्याने मंजुरी दिल्याशिवाय, वर्तमानपत्रात एक ओळ छापता येत नव्हती. आज काय स्थिती आहे? देशातली वृत्तपत्रे, खुले आम आपली 'अजेन्डा पत्रकारिता' चालवू शकत आहेत. नव्या पिढीला आणीबाणी काय चीज होती हे लक्षात यावे म्हणून हा लेखन प्रपंच. २५ जून १९७५ला सुरु झालेली काळरात्र मार्च १९७७ पर्यंत लांबली होती. इंदिरा गांधींचा पराभव झाला आणि दुसऱ्या स्वातंत्र्याची पहाट उगवली.पण तोपर्यंत अनेक जण आयुष्याच्या मशाली पेटवताना त्यातच जळून खाक झाले. अशा अनामिक आत्म्याना त्रिवार वंदन!!

जय हिंद!!

**– रघुनंदन भागवत**

# आणीबाणीच्या कटू स्मृती

**२५ जून** १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. या बाबीला ५० पेक्षा अधिक वर्षे होऊन गेली. तथापि त्याच्या कटू स्मृती अजूनही शिल्लक आहेत. आणीबाणीच्या

या काळात लोकशाहीचा पूर्णपणे गळा घोटण्यात आला. घटनेने दिलेले सर्व अधिकार काढून घेण्यात आले होते.

संपूर्ण देश म्हणजे तुरुंग झाला होता. राजकीय विरोध करणाऱ्या एक लाखापेक्षा अधिक लोकांना तत्कालीन मिसा या कायद्याखाली अटक करण्यात आली होती. या कायद्यानुसार अटक झाल्यानंतर कोणत्याही कोर्टात दाद मागण्याची सोय ठेवण्यात आली नव्हती. या प्रकारची घटना दुरुस्ती करण्यात आली होती.

आणीबाणीच्या काळात सर्व अधिकार ठराविक लोकांच्या हातात एकवटले होते. पोलिसांना स्वैरपणे अधिकार देण्यात आल्यामुळे त्यांनी त्याचा गैरफायदा घेत आपले व्यक्तिगत हिशोब चुकते करत सरकारच्या मर्जीनुसार,विनाकारण केवळ राजकीय विचारांना विरोध या कारणासाठी अनेक निरपराध नागरिकांना जेल यात्रा घडविली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांपासून स्थानिक आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना ठरवून अटक करण्यात आली होती.

सर्व विरोधी पक्षातील पुढाऱ्यांना तुरुंगात ठेवण्यात आले होते. स्वातंत्र्य लढ्यात ज्यांचा उल्लेख लोकनायक म्हणून केला जातो अशा पितृतुल्य जयप्रकाश नारायण यांनाही अटक करण्यात आली होती. तत्कालीन जनसंघ, समाजवादी आणि काँग्रेसच्या विरोधात असलेल्या सर्व पक्षांच्या नेत्यांना अटक करण्यात आली होती. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, एस एम जोशी, मधु दंडवते, इत्यादी विरोधी पक्ष नेत्यांचा समावेश होता.

संपूर्ण देशाचे रूपांतर तुरुंगात झाले होते.

वर्तमानपत्रांसाठी तो सर्वात वाईट काळ होता. सर्व वृत्तपत्रांवर सेन्सरशिप लादण्यात आली होती. कोणताही मजकूर प्रसिद्ध करण्यापूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक होते. जिल्हा माहिती अधिकारी दर्जाच्या नोकरशाहीच्या हातात हे अधिकार देण्यात आले होते. अनेक वृत्तपत्रांनी त्याचा निषेध म्हणून संपादकीय पाने कोरी ठेवली, बातम्या मधील सेन्सर झालेल्या मजकुराच्या जागा कोऱ्या ठेवल्या. दोन-तीन आठवड्यातच यावरही बंदी घालण्यात आली. सरकार म्हणेल तेच आणि सरकारची तळी उचलणाऱ्या बातम्यांनाच फक्त परवानगी देण्यात येत होती. सरकार विरोधी मतप्रवाह असलेल्या वृत्तपत्रांच्या सरकारी जाहिराती बंद करण्यात आल्या होत्या. या वृत्तपत्रांना शाळा, कॉलेजेस च्या जाहिराती देखील मिळणार नाहीत अशी सरकारने तरतूद केली होती. याव्यतिरिक्त त्यांना छपाईसाठी कागद मिळणार नाही अशीही तरतूद करण्यात आली होती.

वृत्तपत्रांच्या आर्थिक नाड्या आवळून ते बंद पडतील असा सरकारचा प्रयत्न होता. कोणताही विरोधी विचार प्रसिद्ध होणार नाही याची या काळात काळजी घेण्यात आली.

या काळातील सरकारच्या मनमानीचे अन्य उदाहरण म्हणजे अनेक गरीब नागरिकांच्या मनाविरुद्ध त्यांच्यावर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ही संख्या काही लाखांमध्ये आहे. नसबंदीचा हा निर्दयी प्रयोग इंदिराजींचे सुपुत्र संजय गांधी यांच्या सुपीक डोक्यातून निघालेला होता. दिल्ली आणि दिल्ली जवळच्या तुर्कमान गेट या भागात झोपडपट्टी आणि गरीब वस्तीत राहणाऱ्याअनेक व्यक्तींना हा अन्याय केवळ आणीबाणीमुळे सोसावा लागला.

प्रसिद्ध गायक किशोर कुमार याने आणीबाणीच्या प्रचाराचे गाणे म्हणण्यास नकार दिल्यामुळे संपूर्ण आणीबाणीच्या काळात त्याची गाणी आकाशवाणी आणि दूरदर्शन वरून वाजवणे आणि प्रदर्शित करणे बंद करण्यात आले होते!

आणीबाणीच्या काळात सरकारची मर्जी न राखल्या मुळे काय होऊ शकते याचे हे सर्वात वाईट उदाहरण आहे.

आणीबाणी हा संपूर्ण राजकीय निर्णय होता. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची निवडणूक अलाहाबाद न्यायालयाने रद्दबातल ठरवल्यामुळे त्यांनी राजीनामा देणे अपेक्षित होते. त्याऐवजी अधिकाराचा दुरुपयोग करून राष्ट्रपतींच्या सहीने वटहुकूम काढून आणीबाणी लादण्यात आली, आणि स्वतःची खुर्ची या गैरमार्गाने त्यांनी राखली.

भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात या प्रकारची कृती ही लांछनास्पद होती.

स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी सत्तेचा हा गैरवापर होता. घटनाकारांनी दिलेले मूलभूत अधिकार रद्द करणे हा तर लोकशाहीचा खून होता. या काळया कुट्ट कालखंडाचे स्मरण देखील क्लेशदायी आहे.

राजकीय फायद्याचा विचार करून १९ महिन्यानंतर त्यांनी आणीबाणी उठवून लगेच निवडणुका जाहीर केल्या. विरोधी पक्ष जेल यात्रेमुळे निष्क्रिय झालेला असल्यामुळे आपण सहज निवडणुका जिंकू या हिशोबाने आणीबाणी उठवून तातडीने निवडणुका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या दुर्दैवाने सर्व विरोधी पक्ष जनता पार्टी या एका झेंड्याखाली एकत्र आले. आणीबाणीच्या अतिरेकामुळे जनतेने त्यांचा पराभव केला हा इतिहास आहे.

त्यांच्या काळात त्यांच्या सोयीने करण्यात आलेली घटना दुरुस्ती पुढे शाश्वत लोकशाहीचा विचार करून त्यात नव्याने बदल करण्यात आले. आणि घटनेचा मूळ ढाचा कायम ठेवण्यात आला.

अत्यंत काळाकुट्ट कालावधी असे आणीबाणी काळाचे वर्णन करता येईल.

भारतासारख्या लोकशाही देशात कोण्या एकाच्या मर्जीने या प्रकारचे हुकूमशाही निर्णय घेतले जाणार नाही याकडे सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

आणीबाणीचा वाईट कालखंड हा लोकशाहीसाठी धडा आहे. सर्व लोकशाही प्रेमी नागरिकांनी हा इतिहास आवर्जून वाचावा, आणि यापुढे असे होणार नाही याची काळजी घ्यावी असे या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

**– डॉ. अभय मंडलिक**

# विश्वः तुमचं.. आणि आभासी युग !

**आपण** तंत्रज्ञानाने विकासाचा नवा टप्पा गाठतोय ही अतिशय समाधानाची नव्हे तर आनंदाची बाब आहे. मात्र या साऱ्या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा देखील आहे. जसे नाण्याला दोन बाजू असतात तसच याबाबतीत देखील आहे. आलेला कृत्रिम बुद्धीमता आणि इतर समाज माध्यमांनी नवा बदल आणला आहे. समाज माध्यमे जशी प्रगत झाली तसे त्याचे धोके देखील आता दिसत आहेत. यात सर्वात मोठा धोका हा मानसिक आरोग्याला आहे.

आरोग्याचा आपण विचार करतो त्यावेळी आपणास शारिरीक आरोग्या सोबतच मानसिक आरोग्याचा देखील विचार करणे आवश्यक असते आणि नेमकेपणाने आपणास याचा विसर पडलेला दिसतो.

घरात चार जणांचे कुटुंब ही शहरीकरणातून नव्याने आलेली समस्या आहे. त्यातही काही कुटुंबात ३ जणच आहेत. अशीही स्थिती आहे. पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी घरातला काळ हा संवादाचा काळ होता. त्यावेळी रेडिओ शिवाय मनोरंजनाचे दुसरे साधन नव्हते. नंतर टिव्हीचा शिरकाव झाला मग २४ तास वाहिन्यांनी मनोरंजनाचा रतिब सुरु केला. आज देशातील विविध भाषक टीव्ही वाहिन्यांची संख्या ११७१ इतकी आहे.

मनोरंजनासाठी वाहिन्या कमी पडताहेत आणि आपण तयार केलेल्या कलाकृतींना व्यासपीठ मिळत नाही. या भुमिकेतून ओव्हर द टॉप अर्थात जढढ चा प्रसार वेगात झाला.

हे सर्व घडत असताना इंटरनेटचा प्रसार वाढला. ज्याला माहिती तंत्रज्ञानाचे युग आपण म्हणतो तसं युग अवतरले. यात फेसबूक, एक्स तसेच इन्ट्राग्राम सारख्या संवाद माध्यमांसोबत दुहेरी संवाद, चित्र संवाद आणि संदेश वहन सुरु झाल. यात 'व्हॉटसअप' ने प्रत्येक हातातला मोबाईलने मानसिक शांततेला पहिला धक्का दिला.

'व्हॉटसअप' हातोहाती पोहचलं, त्यासोबत त्याचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर दिसायला लागला. नवी पिढी अर्थात जेन-झी (Gen-z ) ने याला झटपट स्विकारलं असलं तरी जुनी पिढी कुठेतरी अडखळताना दिसत होती.

यानंतर आलेल्या 'रिल्स' ने एक क्रांती घडवली व सोबत नव्या पिढीची मानसिक शांतता पूर्णपणे संपवली. त्यातच जुन्या पिढीला आता या रिल्सचं 'व्यसन' जडलय की काय असं आता वाटायला लागले आहे. एका घरातील ४ माणसं ४ मोबाईल आणि ४ स्वतंत्र विश्व एकाच छताखाली अशी स्थिती आली आहे.

या रिल्सच्या प्रभावाने मोठ्या प्रमाणावर नवी पिढी दोन प्रकारे स्वतःचं नुकसान करून घेताना दिसते. 'रिल्स' च्या नादात होणारे अपघाती मृत्यू हा स्वतंत्र असा विषय आहे. मात्र आपल्या उपस्थितीची दखल घेणं आपल्या कामाला दाद मिळणं या अपेक्षा वाढलेला नव्या पिढीत नैराश्य वाढत आहे आणि ही धोक्याची घंटा आहे. हातात मोबाईल घेऊन रस्ता ओलांडणारे अनेक जण दुर्दैवाने अपघाती मृत्यूत प्राण गमावून बसले आहेत. या माध्यमाच्या वेडापायी स्वतःची तहान-भूक हरपून झोपही विसरणारे नकळत स्वत:च्या आरोग्यावर परिणाम करून घेत आहेत

२०१३ साली मी या विषयावर प्रथम लिहिलं, त्यावेळी म्हंटल होत की, आठवड्यातून किमान एक 'मोबाईल हॉलीडे' सर्वांनी पाळावा. आता तर स्थिती अशी आली आहे की 'गॅझेट फ्री' अवर्स (तास) दिवसात किती असावेत हे ठरवावं लागणार आहे. टीव्ही, मोबाईत हे सारं मिळून आपला 'स्क्रीन टाईम' किती मर्यादीत ठेवायचा याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. मोबाईल हे संदेशवहन आणि केवळ संदेशवहन इतके मर्यादीत राहिलेलं नाही. मात्र आजही अमेरिकेसारख्या महासत्ता असणाऱ्या देशात 'पेजर' चा वापर अधिक केला जातो हे देखील आपण जाणून घेतलं पाहिजे. 'मोबाईल माझ्यासाठी कि मी मोबाईलसाठी' हे ठरवावं लागणार आहे.

मोबाईलमधील कॉन्टेन्ट बघताना आपल्या मानसिक स्थितीत नेमकेपणाने काय बदल होतात याचा विचार होत नाही. 'न्यूरोसायन्स' च्या अभ्यासातून समोर आलं आहे की, आपल्या मेंदूत कृत्रिम लहरीतून आनंदाची अनुभूती देणारे 'डोपामाइन' असेल तर आपल्याला त्यात अधिक रस असतो, पण कृत्रिम डोपामाईन निर्मिती ही क्षणिक असते. काही झालं तरी ते पूर्णपणे आभासी विश्व आहे.

घरात कुटुंबासोबत होणारा अंवाद, मित्र-मैत्रीणीसोबत चर्चा करणे तसेच, प्रसंगी वाद-विवाद, आपल्या आसपासच्या निसर्गाचं आणि खऱ्या जगाचं भानं असणं म्हणजे खरा आनंद आहे. 'रिल्स' बघताना सोशल मीडिया साईटसब नकळत आपल्या आवडीचा वेध घेऊन त्याच पद्धतीच्या रिल्स सातत्याने आपणास दिसतील असे 'अल्गोरिदम' विकसित करून आपल्या मनाचा नकळत ताबा घेत आहे.

वय झाल म्हणून सांगत नाही पण रेडिओवर पुढचं गाणं कोणतं असेल याची अनिश्चितता आणि अपेक्षा व त्यातील आनंद वेगळा होता. १५ पैशांचं ख्यालीखुशाली कळवणारं 'टपाल' पोस्टकार्ड जितका आनंद देत असे तितका आनंद या आभासी जगात निश्चित नाही.

या स्वागत आहे खऱ्या विश्वात... सोडा ते आभासी विश्वः!

**– प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६

# 'पंचायत'च्या टीमसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट; अरुणाभ कुमार यांनी शेअर केला हृदयस्पर्शी क्षण



**अरुणाभ** कुमार यांनी शेअर केला हृदयस्पर्शी क्षण पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतल्यानंतर भावूक झाले. ते म्हणाले – एका क्रिएटरसाठी यापेक्षा मोठा आनंद असूच शकत नाही. टीव्हीएफ (TVF) चे संस्थापक अरुणाभ कुमार यांनी नुकत्याच एका समिटमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला असून, त्याने इंटरनेटवर सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा फोटो पंतप्रधानांनी त्याच कार्यक्रमात 'पंचायत'मधील कलाकार अशोक पाठक आणि दुर्गेश कुमार यांची घेतलेली भेट आणि त्याबाबत सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टनंतर समोर आला. समिटमधील एका पॅनल चर्चेदरम्यान 'पंचायत'ची टीम उपस्थित होती आणि अरुणाभ कुमारही तेथे असल्यामुळे या संपूर्ण संवादाची चर्चा मालिकेच्या चाहत्यांमध्ये लगेचच रंगू लागली.

इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करताना अरुणाभ कुमार यांनी लिहिले : रिपब्लिक समिट २०२६ मध्ये माननीय पंतप्रधान श्री ऽ परीशपवीरोवळ जी यांची भेट घेण्याचे आणि भारताला महासत्ता बनवण्यासाठी त्यांच्या 'नेशन फर्स्ट' (देश प्रथम) या दृष्टिकोनाबद्दल प्रेरणादायी विचार ऐकण्याचे भाग्य लाभले. त्यांनी 'पंचायत'मधील काही निवडक कलाकार विनोद, बनराकस आणि क्रांती देवी (अशोक भाऊ, दुर्गेश भाऊ आणि सुनीताजी) यांची भेट घेतली. संवादादरम्यान पंतप्रधानांनी त्यांच्या मालिकेतील एक संवाद म्हटल्यावर ते अक्षरशः थक्क झाले. निर्माते आणि क्रिएटर्स म्हणून आमच्यासाठी यापेक्षा मोठा आनंद दुसरा असूच शकत नाही... मी 'पंचायत' आणि टीव्हीएफच्या संपूर्ण टीमचा आभारी आहे. विशेषतः आमचे दिग्दर्शक दीपक मिश्रा (जे पुढील सीझनच्या शूटिंगमध्ये व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत), लेखक चंदन, अध्यक्ष विजय कोशी सर आणि सर्व कलाकार यांचे, ज्यांनी प्राइम व्हिडिओच्या विश्वास आणि पाठिंब्यासह मिळून अशी कलाकृती निर्माण केली जी संपूर्ण भारताच्या मनात घर करून बसली आहे. आम्हाला येथे आमंत्रित केल्याबद्दल अर्णब गोस्वामी आणि रिपब्लिक टीमचे मनःपूर्वक आभार. हा क्षण अशा वेळी समोर आला आहे जेव्हा 'पंचायत'ची लोकप्रियता शिखरावर पोहोचली आहे. टीव्हीएफच्या सर्वात यशस्वी निर्मितींमध्ये गणल्या जाणाऱ्या या मालिकेने चार यशस्वी सीझन्स पूर्ण केले असून ती देशातील सर्वाधिक लोकप्रिय मालिकांपैकी एक बनली आहे. आता तिच्या पाचव्या सीझनबद्दलची उत्सुकताही वाढू लागली आहे. २०२० मध्ये प्रथम प्रदर्शित झालेल्या 'पंचायत'ने ग्रामीण भारताचे वास्तवदर्शी चित्रण आणि एका अभियांत्रिकी पदवीधराची कथा जो गावाचा पंचायत सचिव म्हणून काम करत आयुष्य पुढे नेत असतो. याच्या माध्यमातून प्रेक्षकांची मने जिंकली. गेल्या काही वर्षांत ही मालिका एक सांस्कृतिक घटना (कल्चरल फिनॉमेनन) बनली असून तिच्या साधेपणा, विनोद, भावनिक खोली आणि प्रत्येकाला आपलेसे वाटणाऱ्या पात्रांसाठी तिला भरभरून दाद मिळाली आहे.

या मालिकेला अनेक पुरस्कार मंचांवरही मोठी दखल मिळाली आहे. त्यामध्ये दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अवॉर्ड्स २०२५, पहिला आयफा (IIFA) डिजिटल अवॉर्ड्स २०२५ आणि आयकॉनिक गोल्ड अवॉर्ड्स २०२६ मधील सन्मानांचा समावेश आहे. पुरस्कारांपलीकडे, 'पंचायत' सोशल मीडियावरही एक मोठी सनसनाटी ठरली आहे आणि तिने प्रेक्षकांना उद्योगातील काही अत्यंत लोकप्रिय कलाकारांची ओळख करून दिली आहे. यामध्ये जितेंद्र कुमार, फैसल मलिक, अशोक पाठक, दुर्गेश कुमार आणि इतर अनेक कलाकारांचा समावेश आहे. 'पंचायत'चे यश हे टीव्हीएफच्या प्रभावी कथाकथनाच्या प्रवासाचे प्रतीक आहे. गेल्या काही वर्षांत या स्टुडिओने सातत्याने असे कंटेंट सादर केले आहेत, ज्यांच्याशी प्रेक्षक सहज जोडले जातात आणि जे सर्व पिढ्यांमध्ये लोकप्रिय ठरतात. अलीकडेच 'प्राइम व्हिडिओ प्रेझेंट्स' या कार्यक्रमात टीव्हीएफने अनेक मोठ्या घोषणांसह आपला ठसा उमटवला. "Vvan' आणि 'कॉलेज फेस्ट' या चित्रपटांपासून ते 'पिरॅमिड' आणि 'वंश' यांसारख्या नव्या मालिकांपर्यंत, तसेच 'एस्पिरंट्स', 'पंचायत', 'ग्राम चिकित्सालय', 'सपने वर्सेस एव्हरीवन' आणि 'संदीप भैया' यांच्या नव्या सीझन्सच्या घोषणांसह स्टुडिओने त्या संध्याकाळी सर्वात दमदार आणि वैविध्यपूर्ण कंटेंट लाइनअप सादर केला. टीव्हीएफ आपले कथाकथनाचे विश्व सातत्याने विस्तारत असताना आणि 'पंचायत'ची लोकप्रियता नव्या उंचीवर पोहोचत असताना, अरुणाभ कुमार यांची ही पोस्ट पुन्हा एकदा अधोरेखित करते की भारतीय अनुभवांशी घट्ट जोडलेल्या कथांमुळे या स्टुडिओने प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळी आणि कायमस्वरूपी छाप निर्माण केली आहे.

# राज्यातील पीएमश्री विद्यालयांमुळे इतर शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावेल-धोंडीराम राजपूत



वैजापूर, दि. २४ (प्रतिनिधी) – प्रधानमंत्री स्कुल फॉर रायझिंग इंडिया(पीएमश्री) या योजने अंतर्गत संपूर्ण भारतात१४,५०० शाळा विकसित आणि श्रेणी सुधारित करण्यात येणार आहेत.प्रत्येक तालुक्यात एक शाळा आदर्श बनविण्यासाठी केंद्र व राज्य सरकार कटीबद्ध असून यासाठी पीएमश्री शाळांना केंद्र सरकारने१८ हजार,१२८ कोटी रुपये निधी व राज्य सरकारने हजारो कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

तसेच या पीएमश्री शाळांना अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, शैक्षणिक यंत्र सामुग्री सुविधा उपलब्ध करून दिली असून या शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित केले असून या शिक्षकांनी शाळांची गुणवत्ता, विद्यार्थी गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे असे आवाहन सेवा निवृत्त शिक्षणांधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. ते येथील पालिकेच्या पीएम श्री मौलाना आझाद विद्यालयात बुधवार (ता.२४) रोजी राष्ट्रीय स्तरावरील विषय वृक्षारोपण, स्वच्छता, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मता, पाण्याची बचत, इंधन बचत, व शास्त्रज्ञ तसेच पर्यावरण, जल, जंगल, जमीन संरक्षण, वन्य जीव संरक्षण या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. पालिकेची ही पीएमश्री मौलाना आझाद शाळा तालुक्यातील एकमेव शाळा आहे. ही शाळा तालुक्यातील सर्व शाळा साठी 'रोल मॉडेल' ठरावी, म्हणून शिक्षकाना सर्वंकष प्रयत्न करून विद्यार्थी गुणवत्ता उंचवावी असे प्रतिपादित केले. या प्रसंगी मुख्याध्यापिका नीता पाटील, शिक्षक सर्वश्री तज्ज्ञ शिक्षक बी.बी. जाधव, संदिप शेळके, सुभाष गोमलाडू तज्ञ शिक्षिका सुवर्णा बोर्डे, राजश्री बंड, ज्योती दिवेकर, वैशाली पगारे, श्री. बोढरे, श्री. तगरे यांच्या सह विद्यार्थी व पालक ही उपस्थित होते.

# नांदेड येथे नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची यशस्वी सांगता




नांदेड, दि. २४ (प्रतिनिधी) – नांदेड विभागाच्या इतिहासात प्रथमच, नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक मा. श्री प्रदीप कामले यांच्या मान्यता व मार्गदर्शनाखाली दिनांक १५ ते २० जून २०२६ या कालावधीत सहा दिवसीय नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

दक्षिण मध्य रेल्वे नागरी संरक्षण संघटनेतर्फे आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश नागरी संरक्षण स्वयंसेवकांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी व प्रतिसाद क्षमता अधिक सक्षम करणे हा होता. या प्रशिक्षणामध्ये अग्निसुरक्षा, मूलभूत जीवनरक्षक उपाय (Basic Life Support), बचाव व सुटका तंत्र (Rescue and Extrication Techniques) तसेच आपत्ती व्यवस्थापन या विषयांवरील सैद्धांतिक मार्गदर्शनाबरोबरच सिकंदराबाद व नांदेड येथील अनुभवी प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड येथील नागरी संरक्षण विभागाचे विभागीय आपत्कालीन अधिकारी श्री श्रीनिवास सूर्यवंशी यांनी समन्वयाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. तसेच नांदेडचे नागरी संरक्षण निरीक्षक श्री महारुद्र डिगोळे, श्री उत्तम जाधव, शिवाजी सूतारे सिकंदराबाद येथून आलेले वरिष्ठ नागरी संरक्षण निरीक्षक श्री सुधीर बाबु, श्री अब्दुल हकीम आणि श्री रामबाबू यांनी विशेष सहकार्य करून प्रशिक्षणार्थींना आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सक्षम बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

समारोप समारंभाचे आयोजन नांदेड येथील डीआरएम परिषद सभागृहात करण्यात आले. यावेळी नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक मा.श्री. प्रदीप कामले यांनी प्रशिक्षणार्थींच्या उत्साह व समर्पणाचे कौतुक केले तसेच आपत्ती व्यवस्थापनात शारीरिक तंदुरुस्ती, सततची तयारी आणि नियमित सराव यांचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त, नांदेड श्री दीपचंद्र आर्य तसेच दक्षिण मध्य रेल्वे मजदूर युनियन (SCRMU), नांदेडचे सचिव श्री टी. मणी कुमार यांनीही उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापन व जनसेवेमध्ये नागरी संरक्षण स्वयंसेवकांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.

मान्यवरांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले आणि प्रशिक्षणा दरम्यान प्राप्त झालेले ज्ञान व व्यावहारिक कौशल्ये रेल्वे प्रशासन तसेच समाजाच्या आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेला अधिक बळकटी देतील, असा विश्वास व्यक्त केला.

प्रशिक्षणार्थींना पारितोषिके व स्मृतिचिन्हांचे वितरण करून तसेच आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वीज जाते आणि येते... मध्ये काय घडते?

पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. वीज का गेली, का जाते, या प्रश्नाचे उत्तर आपल्याला माहीत नसते. तसेच वीज जाते आणि येते, या मधल्या काळात काय घडते, हे जाणून घेण्याची गरज आहे.

पावसाळा आणि वीजपुरवठा यांचे नाते सर्वांनीच गृहित धरलेले असते. अर्थात, विजेशिवाय जगण्याची कल्पनाच करणे शक्य नाही, इतके तिचे महत्त्व वाढलेले आहे. त्यामुळे वीज गेली की, आपल्या संतापाचा पारा चढतो. परंतु वीज जाते, हे वास्तव आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. दुसऱ्या दिवशी त्याची बातमीही होते. परंतु, वीज का गेली, का जाते, याचे उत्तर बहुतेकांना माहीत नसते.

**यंत्रणा जोखमीची**

रात्री-अपरात्री वीज गेल्यानंतर काही वेळातच ती परत येते. विजेची यंत्रणा अशी आहे की, ती चालू अथवा बंद करण्यासाठी व्यक्तीची गरज लागते. शिवाय या यंत्रणेत जिवाचा धोका असतो. रात्री-अपरात्री गेलेली वीज काही वेळात परत येते, तेव्हा कोणीतरी त्या पावसात-अंधारात स्वत:चा जीव धोक्यात घालून खांबावर चढलेला असतो. तेव्हा कुठे वीज येते. त्यामुळे वीज यंत्रणेवर दोषारोप करण्यापेक्षा त्याच्यातील गुंतागुंत समजून घेतली पाहिजे.

**सारा पसारा उघड्यावर**

पारंपरिक अथवा अपारंपरिक स्रोतांपासून देशाच्या कानाकोपऱ्यातून निर्माण झालेली वीज ग्राहकांच्या दारात आणणे तेवढे सोपे नाही. त्यासाठी लाखो किलोमीटर वीजवाहिन्यांचे जाळे देशात सर्वदूर पसरलेले आहे. त्याला 'ग्रीड' म्हणतात. हा सारा पसारा उघड्यावर आहे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचा या यंत्रणेवर परिणाम होऊन त्यात बिघाड होण्याची शक्यता असते. चक्रीवादळ, पूर, रस्ते अपघात यामुळे यंत्रणा कधी कधी ठप्प होते. एखादी उच्चदाब वाहिनी कोसळली तर कधी एखादा जिल्हा किंवा काही तालुके अंधारात जातात, तर कधी हा बिघाड गाव किंवा काही भागापुरता मर्यादित असतो. पावसाळ्याच्या सुरुवातीला वादळवारे व आकाशाच्या विजेतील कडकडाट सर्वांनी अनुभवलेला आहे. तारेच्या जाळ्यांमधून घरात आलेली वीज असो की आकाशात लखलखणारी वीज, दोन्हींमध्ये प्रचंड ऊर्जा असते. आकाशात विजेचा कडकडाट सुरू झाला की, घरातील वडीलधारी माणसे वीज उपकरणे बंद करतात. कारण, उच्च दाबामुळे ती जळण्याची शक्यता असते. दोन विद्युत चुंबकीय क्षेत्र एकत्र आल्याने दाब वाढतो व यंत्रणा बंद पडते. नव्हे, तशी सोयच यंत्रणा वाचविण्यासाठी केलेली असते.

**हानी टाळण्यासाठी यंत्रणा** – दुसरी बाब म्हणजे वीज खांबात विद्युतप्रवाह उतरू नये यासाठी चॉकलेटी रंगाचे चिनी मातीचे इन्सुलेटर खांबावर बसविले जातात. बहुधा ते उन्हामुळे किंवा विद्युतप्रवाहामुळे गरम होतात व त्यावर पावसाचे थेंब पडताच त्याला तडे जातात, ज्यामुळे वीजप्रवाह खांबातून जमिनीत उतरतो आणि लगेचच आपात्कालिन यंत्रणा कार्यान्वित होऊन फीडर (वीजवाहिनी) बंद पडतो. जर हा फीडर बंद पडला नाही तर जीवित वा वित्तहानी होण्याचा धोका असतो.

**बिघाड शोधणे जिकिरीचे**

जेव्हा वीजपुरवठा अचानक खंडित होतो, तेव्हा वीज उपकेंद्रातील कर्मचारी जवळच्या उपकेंद्राशी संपर्क साधून त्यांच्याकडे वीजपुरवठा आहे की नाही, याची खात्री करत असतात. वीजपुरवठा असल्याची खातरजमा झाल्यानंतर फीडर चालू केला जातो. जर फीडर पुन्हा ट्रीप झाला (बंद पडला) तर मात्र बिघाड झाल्याचे घोषित करण्यात येते. तथापि, बिघाड शोधणे जिकिरीचे असते. ऊन-वाऱ्याची, पावसाची अथवा अंधाराची तमा न करता ही शोध मोहीम हाती घेतली जाते. कधी बंद पडलेल्या वाहिनीवरील सर्व खांब तपासावे लागतात, तर कधी हा बिघाड काही खांबांदरम्यान सापडतो.

**रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग**

वीज कर्मचाऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सदैव सज्ज राहावे लागते. चूक झाली की जीव जाणार, याची खूणगाठ बांधूनच त्यांना खांबावर चढावे लागते. सर्व प्रकारची काळजी घेऊनही वीज कर्मचाऱ्यांना प्राणांतिक अपघात होण्याच्या घटना अधूनमधून घडत असतात. परंतु, मानवी संवेदना इतक्या क्षीण झाल्या आहेत की, एखाद्याच्या जिवाचे मोलही आपण ध्यानात घेत नाही. वीज जाते आणि येते, यादरम्यान काय होते, याचा विचार आपण जेव्हा करू त्यावेळी आपण महावितरण किंवा कोणत्याही वीज कर्मचाऱ्याला दोष देणार नाही.

**वीज गेल्यास काय करावे आणि काय करू नये? –**

१.आपल्या घरात आरसीसीबी (रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर) असणे गरजेचे आहे, जेणेकरून घरातील वीज यंत्रणेत बिघाड झाला तर वीजपुरवठा बंद होऊन जीवितहानी टाळता येईल.

२.अर्थिंग सुस्थितीत असली पाहिजे. गरजेनुसार त्याची तपासणी करावी.

३.वीज उपकरणे किंवा वायरिंग ओलाव्यापासून किंवा पत्र्यापासून सुरक्षित असावी.

४.वीज उपकरणे हाताळताना पायात स्लिपर घालावी व वीजपुरवठा बंद झाल्याची खात्री करावी.

५.विद्युत खांबाला व ताणाला जनावरे बांधू नयेत.

६.वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे थांबूनच वीज कंपनीला संपर्क करावा.

७.बिघाड नेमका कोठे झाला याची माहिती असल्यास वीज कंपनीला संपर्क करावा.

८.विजेच्या तारा तुटल्यास त्याला हात लावू नये. तातडीने महावितरणला माहिती द्यावी.

**खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी विविध पर्याय**

वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे वाट पाहूनच महावितरणला माहिती द्यावी. त्यासाठी महावितरणच्या १९१२, १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर द्यावी. तसेच आपल्या रजिस्टर्ड मोबाईल क्रमांकावरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिसकॉल द्यावा अथवा छजझजथएठ □ग्राहक क्रमांक हा एसएमएस ९९३०३९९३०३ या क्रमांकावर पाठवावा. महावितरणच्या मोबाईल ॲपवरूनही ग्राहक ही माहिती देऊ शकतात. अतिवृष्टी, वादळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे वीजवाहिन्या तुटणे, खांब कोसळणे अथवा विद्युत दुर्घटनेची शक्यता निर्माण झाल्यास त्याची माहिती टोल फ्री क्रमांकांवर किंवा स्थानिक नियंत्रण कक्षाच्या ७०६६०४२४१२ (छत्रपती संभाजीनगर शहर मंडल), ७८७५७५६६५२ (छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडल) व ७८७५७६४१४४ (जालना मंडल) या क्रमांकांवर तात्काळ द्यावी.

**– ज्ञानेश्वर आर्दड**
जनसंपर्क अधिकारी, महावितरण,
छत्रपती संभाजीनगर परिमंडल

# लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात




पुणे दि. २४ ( प्रतिनिधी ) – ज्येष्ठ नागरिक हे माझ्या कुटुंबासारखे आहेत. त्यांना आवर्जून सांगू इच्छितो की, तुम्ही उमेदीच्या काळात भरपूर कष्ट केले. आता या वयात स्वतःसाठी जगा, जीवनाचा आनंद घ्या, कोणी काय म्हणेल यांचा विचार न करता. उर्वरित जीवनाचा मनमोकळेपणाने आनंद घ्या असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. बुधवार दि. २४ रोजी गोविंद गार्डनच्या बासुरी हॉलमध्ये ज्येष्ठ नागरिक सदस्यांच्या उत्फुर्त प्रतिसादात हा कार्यक्रम झाला.

यावेळी व्यासपीठावर नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, नगरसेविका अनिता काटे, उद्योजक संजय भिसे, संदिप काटे, जयनाथ काटे, संदेश काटे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक वारकर तसेच अश्विनी शेकटकर, पांडुरंग कांबळे, दिलिप ताम्हणे, दगाजी पाटील, किर्तीमाला मोरे, ॲड. प्रदिप बादगुडे, छाया वायकर, रमेश काळे, सुरेश बर्डे, शरदकांत नेरकर, किशोर देशमुख, सी. व्हि. ब्राह्मणकर हे पदाधिकारी उपस्थित होते. संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांनी अहवाल वाचन केले. दिलिप ताम्हणे यांनी वार्षिक लेखाजोखा सादर केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिंतामण कविटकर आणि राजेंद्र मांजरेकर यांनी केले तर अश्विनी शेकटकर यांनी आभार मानले. संघातील सदस्य तसेच गायिका वीणा यांनी मनोरंजनपर गाणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

# वैजापूर शहर तालुक्यात शैक्षणिक गुणवत्तेचा चढता आलेख

**वैजापूर** शहर व तालुक्यातील विविध शैक्षणिक शाळा व महाविद्यालयातून गत दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेने कमालीची उंची गाठलेली आहे. विविध शाळा आणि महाविद्यालयातून अत्यंत दर्जेदार शिक्षण देण्याचा व विद्यार्थी स्वावलंबी बनण्यासाठी शाळा व महाविद्यालयातील स्थानिक समित्या व शिक्षक व प्राध्यापक सर्वंकष प्रयत्न करीत आहेत. शहर व तालुक्यात दोन वैद्यकीय महाविद्यालय आहेत. नर्सिंग कॉलेजेस आहेत,अभियांत्रिकी महाविद्यालय आहेत. कृषी महाविद्यालय आहेत.

डी.बी. व एम.फार्मसी शिक्षण सुविधा आहेत व दर्जेदार प्राथमिक व माध्यमिक शाळा ही आहेत. शहराच्या जवळ तीन की.मी.अंतरावर आघुर व रोटेगाव शिवारात राजे संभाजी प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय आहे. या शाळेच्या कॅम्पस मध्ये बी.व एम, फार्मसी महाविद्यालय आहे.शैक्षणिक क्षेत्रातील व्यवसायिक ऊच्च पदवी साठी येथे महाविद्यालय आहे.अत्यंत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणांसाठी हे शैक्षणिक संकुल जाणल्या जाते. शहरात अत्यंत नावाजलेली इंग्रजी माध्यमाची माध्यमिक व उच्च माध्यमिक सेंट मोनिका शैक्षणिक संस्था यांनी सी.बी. एस. ई. अभ्यासक्रम ही आरंभ केलेला आहे.सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा व उच्च शैक्षणिक पात्रता धारक शिक्षक सेंट मोनिका च्या दोन्ही शाळेत आहेत.या शाळेतील विद्यार्थी देश-विदेशात उच्च पदावर कार्यरत आहेत. कोपरगावच्या संजीवनी ग्रूपची इंग्रजी माध्यमाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ही दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी जाणल्या जाते.येथील विद्यार्थी देश -विदेशात आहेत. आरोहन इंग्लिश माध्यम शाळा ही आपल्या गुणवत्तेसाठी जाणल्या जाते. शहरात जिल्हा परिषदची मुलां-मुलींची एकमेव शाळा आहे.

मात्र या शाळेत विद्यार्थी संख्या बोटावर मोजण्यासारखी आहे. शहरात नगर पालिकेच्या १९प्राथमिक शाळा आहेत.यातील पीएमश्री मौलाना आझाद विद्यालय म्हणून अत्यंत दर्जेदार व विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधा ,व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी शाळा आहे. पालिकेचीच श्री. स्वामी समर्थ विद्यालय सुद्धा सर्व सोयी, सुविधा व शैक्षणिक दर्जा उच्च राखणारी शाळा आहे.

विनायकराव पाटील महाविद्यालय व जाधव महाविद्यालय आहेत येथे कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील पदवी व पदव्युत्तर शिक्षण सुविधा आहेत.कदम नर्सिंग कॉलेज व पदविका कॉलेज मधून उच्च शिक्षण येथे विद्यार्थी घेत आहेत.शहरात वैद्यकीय महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज आहे. शहरात न्यू हायस्कुल व करुणा निकेतन, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा येथेही विद्यार्थी संख्या आहे. ग्रामीण भागात खंडाळा येथे वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषी महाविद्यालय आहे,तर दहेगाव येथेही कृषी महाविद्यालय आहे, ग्रामीण भागात ही दर्जेदार शिक्षण देणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. शिऊर, वाकला, बोरसर, लासुरगाव, परसोडा, मनूर येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत,परंतु या शाळेतील संख्या दिवस न दिवस रोडावत आहे. एकंदरीत वैजापूर शहरात व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात प्राथमिक,माध्यमिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, नर्सिंग, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा व महाविद्यालय आहेत .विद्यार्थ्यांना बाहेर गावी जाऊन शिक्षण घेण्याची गरज नाही तरीही वैजापूर येथून कोपरगाव, येवला येथे जाणारे शेकडो विद्यार्थी आहेत. वैजापूर शहर व तालुका आता शैक्षणिक 'हब' बनण्याच्या मार्गावर आहे,एव्हढे मात्र निश्चितच.

**– बाबासाहेब धुमाळ,** वैजापूर

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे-मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम





छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक जनजागृती, लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांचा सहभाग तसेच प्रशासनातील सर्व यंत्रणांमध्ये समन्वय आवश्यक असून, कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या आढावा व मार्गदर्शन बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागातील जिल्हाधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी तसेच निवडणूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम म्हणाले की, मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व अद्ययावत करण्यासाठी निवडणूक आयोगाने विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मदत कक्ष स्थापन करून त्यांना वस्तुनिष्ठ माहिती उपल ब्ध करून द्यावी. स्थानिक ल ोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) आणि स्वयंसेवक यांना विश्वासात घेऊन ही मोहीम राबविण्यात यावी. भारतीय संविधान, लोकप्रतिनिधी कायदा तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयांचा अभ्यास करून कायदेशीर तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, तसेच अपात्र नोंदींची काटेकोर छाननी करूनच आवश्यक निर्णय घेण्यात यावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदान केंद्रनिहाय उद्दिष्टे निश्चित करून मतदार यादी मॅपिंगच्या कामाला गती देणे, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, प्रशिक्षण कार्यक्रम, पडताळणी प्रक्रिया तसेच अर्ज व्यवस्थापन यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन करणार आहेत. यावेळी मतदारांची माहिती, नाव, पत्ता, छायाचित्र तसेच या माहितीतील विसंगती आणि इतर तपशीलांची पडताळणी केली जाणार आहे. तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा डुप्लिकेट नोंदींची तपासणी करून मतदार यादी अधिक अचूक करण्यावर भर देण्यात येणार आहे. ही संपूर्ण अचूक माहिती डिजीटल पध्दतीने अपडेट करण्याचे काम वेळेत झाल्याचीही संबंधितांनी खात्री करून घेण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

श्री. चोक्कलिंगम यांनी विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम राबविण्यासंदर्भातील संबंधित अधिकारी यांच्या अडचणी व शंकांचे निरसन करत त्यांना मार्गदशन केले तसेच त्यांनी केलेल्या सुचनांची नोंद घेत विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम लोकशाही बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून, प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले.

बैठकीत विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील तयारीची माहिती सादर केली. प्रशिक्षण, जनजागृती, मॅपिंग, बीएलओ नियुक्ती, अर्ज वितरण व पडताळणी प्रक्रिया यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यावेळी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, हिंगोली जिल्हा अधिकारी राहुल गुप्ता, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा




छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाजकल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर तसेच आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्र, बार्शी (जि. सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन व अवैध तस्करी विरोधी दिन तसेच नशामुक्त भारत अभियान अंतर्गत राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा सोमवारी (दि. २२) रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली.

अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण आर. एम. शिंदे हे होते. प्रमुख पाहुणे अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सच्या पोलीस निरीक्षक श्रीमती गीता बागवडे, पोलीस निरीक्षक, , डॉ. संदीप तांबारे, डॉ. बालाजी जाधव, डॉ. कविता आंधारे, उपस्थित होते. 'नशामुक्त भारत अभियान मार्गदर्शक पुस्तिका' चे प्रकाशन करण्यात आले. तसेच एनडीपीएस कायदा, व्यसनमुक्तीसाठी संतुलित आहार, संत साहित्याचा व्यसनमुक्ती संदेश, अल्कोहोलिक्स ॲनॉनिमसची कार्यपद्धती, मानसिक प्रशिक्षण आणि व्यसनप्रतिबंधक जीवनकौशल्ये या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सौ. अनुपमा शेटे यांनी केले. समारोपप्रसंगी सर्व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. या कार्यशाळेस राज्यभरातील २०० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. आयोजनासाठी सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाजकल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर तसेच आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जनसंपर्क अभियानांतर्गत माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांचा व्यापारी व नागरिकांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्याचे संयोजक तथा माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व खासदार डॉ. भागवत कराड यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध व्यापारी व दिगंबर जैन समाजाचे विश्वस्त श्री किरण पहाडे यांच्या किराणा चावडी येथील निवासस्थानी व्यापारी व नागरिकांशी संवाद साधला.

या संवाद कार्यक्रमात परिसरातील व्यापारी, उद्योजक व नागरिकांनी विविध विकासकामे, स्थानिक समस्या तसेच शासनाकडून असलेल्या अपेक्षांबाबत आपली मते मांडली. कार्यक्रमास नगरसेवक श्री विजय झाला व नगरसेविका सौ. कीर्ती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजेश मेहता यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. भागवत कराड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत देशात केलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला. पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार, डिजिटल क्रांती, सामाजिक कल्याण योजना आणि आर्थिक विकास या क्षेत्रांतील विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर उपस्थित व्यापारी व नागरिकांकडून शासनाकडून असलेल्या अपेक्षा, स्थानिक अडचणी व विविध प्रश्न जाणून घेत त्यावर सकारात्मक चर्चा केली. जनतेच्या सूचनांची नोंद घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. या संवाद सोहळ्यास डॉ सन्मति ठोले भांडे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष पातुरकर, सोनार असोसिएशनचे आतिश सवाईवाला, इलेक्ट्रिकल असोसिएशनचे रवि पहाडे, निलेश पहाडे, रमेश कासलीवाल, मोंढा व्यापारी संघाचे प्रतिनिधी उमेश चुडीवाल, निलेश अग्रवाल, मनीष जैस्वाल, निकेतन कासलीवाल यांच्यासह अनेक व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात विकास, लोकसहभाग आणि नागरिकांच्या अपेक्षांवर सकारात्मक चर्चा झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

## पावसाळी नियंत्रण कक्षाच्या कामकाजाचा आयुक्तांकडून आढावा; आपत्ती व्यवस्थापनासाठी महत्त्वपूर्ण सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत स्मार्ट सिटी कार्यालयातील पावसाळी नियंत्रण कक्ष येथे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस उपायुक्त अंकुश पांढरे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख स्वप्नील सरदार, अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर, आरआरटी ( रॅपिड रेस्पॉन्स टीम) सेल (आरोग्य विभाग) प्रमुख डॉ. वैशाली मुदगडकर तसेच आयटी सेलचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आयुक्तांनी पावसाळी नियंत्रण कक्षातील उपस्थिती, तक्रार निवारण व्यवस्था व नागरिकांना तात्काळ मदत पोहोचविण्याच्या कार्यपद्धतीचा आढावा घेत विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

त्यामध्ये स्मार्ट सिटीच्या आयसीसीसी यंत्रणेचा आपत्तीपूर्व तयारी व आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रभावी वापर करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सखल भागांवर सातत्याने लक्ष ठेवून संबंधित विभागांना वेळेवर सूचना देण्याचे आदेश देण्यात आले.

शहरातील पूरप्रवण व पाणी साचणाऱ्या भागांची यादी तयार करून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे, कॅमेरे नसलेल्या भागांमध्ये स्थानिक संपर्क नागरिकांची नियुक्ती करून त्यांच्यामार्फत परिस्थितीची माहिती मिळविणे व तक्रारींचे तातडीने निवारण करण्यावर भर देण्यात आला.

तसेच शहरातील अत्यावश्यक सेवा व महत्त्वाच्या ठिकाणांचे मॅपिंग करून संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविणे, पावसाळी नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे, स्मार्ट सिटी अंतर्गत बसविण्यात आलेली सार्वजनिक उद्घोषणा २४×७ कार्यरत ठेवणे आणि त्याची पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या चॅटबॉटमध्ये आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सेवांचे तात्काळ एकत्रीकरण करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच पदमपुरा फायर कंट्रोल रूमचा व्हॉट्सॲप क्रमांक पावसाळी नियंत्रण कक्षाशी जोडून आपत्तीविषयक माहिती संबंधित अधिकारी व विभागांपर्यंत त्वरित पोहोचविण्याची व्यवस्था करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

पावसाळ्यात नागरिकांना जलद, समन्वयित व प्रभावी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तत्परतेने प्रतिसाद देता यावा, या उद्देशाने वरील सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित विभागांना दिले.

# ओमराजे निंबाळकर यांचे शिंदे गटात जाण्याचे प्लॅनिंग महिनाभरापासूनच सुरु होते; चुलत बंधू मकरंदराजे निंबाळकरांचा गौप्यस्फोट

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी)- खासदार ओमराजे निंबळकरांच्या बंडाबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. ओमराजे निंबाळकर यांचे महिनाभरापासून बंडाचे प्लॅनिंग सुरू होते, पक्षांतराबाबत चर्चा झाली होती, मात्र तो निर्णय मला मान्य नव्हता, असा थेट दावा त्यांचे चुलत बंधू मकरंद राजेंनी केला आहे. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पक्षांतराच्या निर्णयाला आता घरातूनच विरोध झाल्याचं चित्र आहे. स्वतःचे बंधू आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांनी ओमराजेंच्या निर्णयापासून स्पष्टपणे फारकत घेत ठाकरेंसोबतच राहणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे ओमराजेंच्या नव्या राजकीय वाटचालीला पहिला मोठा धक्का घरातूनच बसल्याची चर्चा रंगली आहे. मकरंदराजे निंबाळकर हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धाराशिव जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख आहेत.

दहा वर्षे एकत्र राजकारण करणारे दोन भाऊ आता वेगवेगळ्या राजकीय वाटांवर उभे ठाकल्याचे चित्र दिसत आहे. एवढंच नाही तर पक्षाचा आदेश मिळाला तर ओमराजेंच्या विरोधात रस्त्यावर उतरायलाही तयार असल्याचा इशारा मकरंद राजेंनी दिला आहे. ओमराजे यांनी पक्षांतराबाबत माझ्यासोबत चर्चा केली. मात्र मला निर्णय पटला नाही , त्यांनी त्यांचा निर्णय घेतला. मी समजूनही सांगण्याचा प्रयत्न केला. २०२९ ला ही आपण सहज निवडून येऊ, असे सांगितलं, पण त्यांनी ऐकले नाही. व्यवस्थेला जाब विचारून काम करून घेणे ही शिवसेनेकडून अपेक्षा असते, यापुढे काम तसं होईल. पक्षाने आदेश दिला आणि गरज पडली तर ओमराजेंच्या विरोधात रस्त्यावरही उतरण्याची तयारी असल्याचेही मकरंदराजे निंबाळकर यांनी म्हटले.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या धाराशिव दौऱ्याची तयारी सुरू झाली असून संघटनात्मक बांधणीवर भर देणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. ओमराजेंनी पक्ष सोडला तरी शिवसैनिकांची गर्दी आणि ताकद कायम ठाकरेंसोबतच राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. धाराशिवच्या राजकारणात आता लढाई भावाविरुद्ध भाऊ अशी पहायला मिळणार आहे.

## बिडकीनमधील मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत द्या; आ.विलास भुमरे यांची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- पैठण तालुक्यातील बिडकीन येथील पाच तरुणांच्या गणपतीपुळे येथे समुद्रात बुडून झालेल्या दुर्दैवी मृत्यूची दखल विधानसभेत घेण्यात आली. आमदार विलास भुमरे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत मृत तरुणांच्या कुटुंबियांना शासनाकडून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली. भुमरे यांनी सांगितले की, बिडकीन गावातील १९ तरुण पर्यटनासाठी गणपतीपुळे येथे गेले होते. यावेळी समुद्रात बुडून हिमांशू कांबळे, प्रेम आदमने, आदित्य राऊत, अनिकेत हिवराळे आणि आनंद नरवडे या पाच तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेनंतर मृतदेहांचा शोध घेण्यासाठी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत तसेच स्थानिक प्रशासनाने केलेल्या तत्पर सहकार्याबद्दल त्यांनी सभागृहात आभार व्यक्त केले. मृत्यूमुखी पडलेले तरुण हे आपल्या कुटुंबातील कर्ते सदस्य होते. त्यांच्या अकाली निधनामुळे संबंधित कुटुंबांवर मोठे आर्थिक व मानसिक संकट ओढवले आहे. त्यामुळे शासनाने संवेदनशीलता दाखवत या सर्व पीडित कुटुंबांना तातडीने प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करावी, अशी मागणी आ. भुमरे यांनी केली.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

मा. कार्यकारी अभियंता, म.रा. वि. वि. कंपनी मर्या. विभागीय कार्यालय ग्रामीण विभाग २ यांच्या कार्यालयाकडून निविदा नं. EE/RDN-2/TS/T-05, 07, 08 / 2026-27 ग्रामीण विभाग २ विभागा अंतर्गत अनुक्रमे वाळूज, फुलंब्री व गंगापूर या उपविभागांकरीता पी. सी. ० मधील वीज ग्राहकांची दर महिन्यात CMRI द्वारे व MR - 9 द्वारे मीटर रीडिंग घेणे वीज बिल छपाई व वीज बिले ग्राहकांना वाटप करणे या कामाकरिता नामनिर्देशित करण्याकरिता प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. वरील प्रमाणे नमूद निविदा प्रशाशकिय कारणास्तव रद्द करण्यात आलेल्या आहे. तसेच निविदा क्र. ई EE/RDN2/TS/T-09/ 2026-27 या नुसार पी. सी. ० मधील वीज ग्राहकांची दर महिन्यात CMRI द्वारे व MR 9 द्वारे मीटर रीडिंग घेणे वीज बिल छपाई व वीज बिले ग्राहकांना वाटप करणे या कामासाठी ग्रामीण विभाग २ साठी नामनिर्देशित करण्याकरिता निविदा विक्री कालावधी दि २५.०६.२०२६ ते ०१.०७.२०२६ असा आहे निविदा भरण्याची शेवटची तारीख दि ०१.०७.२०२६ वेळ: सायंकाळी ५ वाजेपर्यंत महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध आहे.

PRO NO : 76 — कार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण विभाग २


## इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनींच्या पार्थिव अंत्यसंस्कारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना उपस्थित राहण्याची विनंती

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यसंस्कार कार्यक्रमासाठी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अधिकृत आमंत्रण पाठवले आहे. या अंत्यसंस्कार कार्यक्रमासाठी जगभरातील प्रमुख नेत्यांना आमंत्रित करण्यात आले असून, यात भारतासह चीन, रशिया, फ्रान्स, कतार आणि पाकिस्तानच्या राष्ट्रप्रमुखांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवी दिल्लीतील इराणी दूतावासाकडून मंगळवारी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला हे अधिकृत निमंत्रण सोपवण्यात आले.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी (वय ८६) यांचा फेब्रुवारी महिन्यात अमेरिका आणि इस्त्रायलच्या संयुक्त हवाई हल्ल्यात मृत्यू झाला होता. युद्धजन्य परिस्थितीमुळे आधी मार्च महिन्यात होणारा हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता जुलै महिन्यात हा कार्यक्रम अत्यंत भव्य प्रमाणात पार पडणार आहे.

## रविवारपर्यंत मुसळधार कोसळणार, मान्सूनने महाराष्ट्र व्यापला

पुणे दि.२४ (प्रतिनिधी)- मान्सूनने बुधवारी संपूर्ण महाराष्ट्र व्यापला असून रविवार (दि. २८) पर्यंत राज्यात काही भागांत मुसळधार, तर काही भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, मान्सूनने यंदा ९ दिवस विलंबाने महाराष्ट्र व्यापला. साधारणपणे १५ जूनच्या आसपास मान्सून राज्य व्यापत असतो. यासोबतच मान्सूनने गुजरात तसेच मध्य प्रदेशातही प्रवेश केला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, अरबी समुद्रातून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांच्या प्रभावामुळे राज्यातील मान्सूनला गती मिळाली आहे. २१ जूनपासून राज्यात पावसाचे पुनरागमन झाले असून त्यानंतर तो सुसाट सुटला आहे. सक्रिय झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत त्याने राज्य व्यापले आहे. राज्यात येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे राज्यात सर्वत्र पावसाने दमदार हजेरी लावली आहे.

(पान १ वरुन)

## तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी..

ठिकाणी आहेत. अधिकाऱ्यांची देखील लॉबी आहे, पालघरला गुटका उतरला की महाराष्ट्रात कसा फिरतो? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. सोमवारी मी याचा गौप्यस्फोट करणार आहे. यामध्ये कोण आहे याबाबत सांगणार असल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले. लॅबमध्ये गेले की फेल होते, सेटलमेंट केली जाते, असे आव्हाड म्हणाले.

मंत्री नरहरी झिरवाळ हे सामान्य माणूस साधा माणूस आहे, त्यांच्यावर दबाव आहे. त्यांचा राजीनामा झाला असता इतका दबाव असल्याचे आव्हाड म्हणाले. तुकाराम मुंढे आल्यापासून पहिल्यांदा बाजारातून सगळं गायब झालं आहे. महाराष्ट्राला वाचवणार असेल तर जनतेनं यात लक्ष घातलं पाहिजे. सगळं मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणलं आहे. तांदळाची भेसळ होते, आश्रम शाळेत जाते. ती कोण रोखणार? असा सवाल देखील आव्हाड यांनी केला आहे.

## हॉटेलमध्ये पिण्यायोग्य पाणी...

पाणी देऊ नये, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा. जर एखाद्या ग्राहकाने या व्यतिरिक्त बाटलीबंद पाणी मागितलं तर त्याला ते द्यावं. जर याची अंमलबजावणी केली नाही तर कारवाई करण्यात येईल असा इशारा तुकाराम मुंडे यांनी दिला.

ग्राहकांनी हॉटेलमध्ये आल्यानतंर त्यांना सुरक्षित पाणी, द्रवसाधन, टॉवेल, साबन देणं बंधनकारक आहे, त्यामुळे ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित राहते, असं तुकाराम मुंढे म्हणाले.

## महामार्गांसाठी लाखो कोटी,...

जयंत पाटील यांनी खतांच्या वाढत्या किंमतींचा मुद्दाही सभागृहात उपस्थित केला. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, औषधे आणि इतर निविष्ठांच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. मात्र, शेतमालाच्या भावात त्यानुसार वाढ होत नसल्याने शेतकऱ्यांचे गणित कोलमडत असल्याचे त्यांनी नमूद केले. कृषी उत्पादनाचा खर्च दिवसेंदिवस वाढत असताना शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत नसल्यामुळे शेती व्यवसाय तोट्यात जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## खर्गे पिता-पुत्रावर भाजपचा...

सदस्य आहेत'', असा आरोप भंडारी यांनी केला. ट्रस्टच्या विरोधात भ्रष्टाचाराचे अनेक प्रकरणं असल्याचा दावा देखील भंडारींनी केला.

प्रियाकं खर्गे कर्नाटक सरकारमध्ये मंत्री आहेत. मल्लिकार्जुन खर्गे देखील या ट्रस्टचे सदस्य आहेत. केवळ एकच नव्हे भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणं मी तुमच्यासमोर मांडतो. ट्रस्टच्या माध्यमातून मल्लिकार्जुन खर्गेंनी राजकीय दबावाचा वापर करुन गरीबांच्या जमीन हडप केल्या, असा आरोप भंडारी यांनी केला. २०२४ मध्ये कॉंग्रेस सरकारच्या काळात कर्नाटक सरकारच्या औद्योगिक विकास मंडळाने ट्रस्टला जमीन देऊ केली, असाही दावा भंडारी यांनी केला. हवाई आणि संरक्षण क्षेत्रात संशोधन आणि विकास संस्थेसाठी म्हणून देण्यात आलेली पाच एकर जमीन ट्रस्टला दिल्याचा आरोपही भंडारी यांनी केला.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय
सा.बां. परिसर, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर -४३१००१
दूरध्वनी क्रमांक-०२४०-२४८७०४६ E-Mail: elaurangabad.ee@mahapwd.gov.in

जा.क्र. काअविछसं/निविदा/२२६७/सन-२०२६ — दिनांक-२२/६/२०२६

**ई- निविदा सुचना क्रमांक : ०४ सन- २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, न्यायमुर्ती नगर शेजारी, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर दुरध्वनी क्रं. ०२४०-४८७०४६ हे खाली दर्शविलेल्या कामाच्या ई-निविदा प्रणाली व्दारे ऑन-लाईन ई-निविदा महाराष्ट्र शासनाकडिल योग्य त्या नोदणीकृत वर्गातील विद्युत ठेकेदार यांचेकडून महाराष्ट्र शासन ई-निविदा प्रणालीवर www.mahatenders.gov.in ई- निविदा बाबतच्या संपूर्ण तपशिल महाराष्ट्र शासन ई-निविदा संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वरुन दि. २५/०६/२०२६ ते ०२/०७/२०२६ वेळ सकाळी १०.३० ते संध्या. १७.३० वाजेपर्यंत डाऊनलोड करु शकतात, निविदा उघडण्याचा दि. ०६/०७/२०२६ वेळ सकाळी ११.०० वाजेपर्यत राहिल.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम | ईसारा रक्कम टक्के | सुरक्षा रक्कम टक्के | काम पुर्ण करण्याचा कालावधी | ई- निविदा शुल्क | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Est. No. OW/CSNSDn.1/112048/2025-26, Supplying, Installing, Commissioning and Testing AI Featured IP CCTV Cameras Surveillance System in Premises Maharashtra National Law University Aurangabad, Kanchanwadi, Chhatrapati Sambhajinagar. | 39722479 | 199000 | 398000 | 120 Days | 2360/-Non Refundable | Valid Electrical License issued by IE & L Dept Gove of Maharashtra |
| 2 | Est No. AESD/OW/ 113022/2025-26 Providing Solar street Lights and LED street lights and LED Highmast for proposed Bypass road to NH-52(old NH 211) near Ellora Cave no 1 to Ghrushneshwar temple (1.6 km) at Verul, Tq. Khultabad, Dist. Chh. Sambhajinagar | 15425357 | 150000 | 154500 | 300 Days | 1180/-Non Refundable | Valid Electrical License issued by I.E & L Dept Gove of Maharashtra |
| 3 | Estimate No: 121061 Of 2026-27 Providing Internal Installation, External Installation, CCTV System and Fire Fighting System for Proposed 100 Prisoners Open Barrack and 16 Transgender Barrack at Central Jail Premises at Chhatrapti Sambhajinagar. | 12221118 | 122500 | 250000 | 300 Days | 1180/-Non Refundable | Valid Electrical Contractor License issued by I.E.& L Deptt with Valid Registered Electrical Contractor Class 'A' or above issued by Public Works Deptt. (Elect), Govt. of Maharashtra |

इतर आवश्यक विस्तृत माहितीकरीता व ई- निविदा शर्तीच्या प्रक्रियेकरिता वरिल संकेतस्थळावर भेट दयावी निविदा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा लागेल, १ टक्के इसारा रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा आणि निविदा फिस वरीलप्रमाणे. सदर कामाचा थेट विमा शासकिय विमा निधी संचनालय महाराष्ट्र यांचेकडे उतरविणे बंधनकारक राहिल.

जा.क्र. काअविछसं/निविदा/२२६७/सन-२०२६-२७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा. बां. विद्युत विभाग, राज पेट्रोल पंपासमोर,
छत्रपती संभाजीनगर. दि २२/६/२०२६

स्वाक्षरीत/-
कार्यकारी अभियंता
सा. बां. विद्युत विभाग,
छत्रपती संभाजीनगर

डीजीआयपीआर/२०२६-२०२७/१२९१